## प्रकरण चौथे

## चंद्रबनातल्या सावल्या : वाङ्.मयीन विशेष.

ग्रामजीवनातील कस आणि नस असलेल्या व्यक्ती, संस्कृतीचं संचित आणि परंपरा प्राप्त झालेली स्थळं आणि आगळेवेगळे पशुपक्षी यांच्यातील सूक्ष्म आणि तरल असा भावबंध, अतीव संवेदनशीलतेने टिपणारा, प्रा. चंद्रकुमार नलगे यांचा " चंद्रबनातल्या सावल्या " हा दुसरा ललित लेखसंग्रह १९८९ साली प्रसिध्द झाला.

### अनुभवविश्वावर ओझरती नजर

वारणाखोरे, त्यातील भेडसगांव हे खेडे आणि त्याच्या लगतच्या परिसरांतील सारा निसर्ग या पुस्तकांतील सोळा लेखांतून जिवंतपणे प्रत्ययाला येतो. या परिसराला लेखकाच्या स्मृतिकोषांत एक " संचित" म्हणून अढळ स्थान मिळते, नव्हे तो त्याच्या जीवनाचा एक अविभाज्य भागच बनून जातो. इतकी एकरूपता लेखकाची येथल्या मातीशी, आभाळाशी झालेली आहे. म्हणूनच सहजपणे लेखणीतून शब्द झरतात-" केवढं मोठं आभाळ, त्यांत न मावणांर चांदणं ! लेखकाला हा सारा परिसरच चंद्रबन वाटतोय.या वारणा परिसरात कांही सुपुत्र जन्माला आले. इतिहास असलेल्या या खो-यातील लोकांनी ब्रिटिशाविरूध्द क्रांतीचे डावपेच लढवले.

आहेत. शिवबाला साथ दिलेली आहे. आपापल्या परीने या खेडयातील पशुपक्षीही नमुनेदार आहेत. फुले, पक्षी, आणि प्राणी यांचे कितीतरी उल्लेख या पुस्तकांत आलेले आहेत. थोडक्यांत व्यक्ती, पशुपक्षी आणि स्थळे यामुळे " चंद्रबनांतल्या सावल्या" तील अनुभवविश्व गडदगहिरे आणि व्यामिश्र बनलेले आहे. येथल्या चांदण्यांत गूढधूसरता मिसळलेली आहे, सत्याच्या गार सावलीत असल्याचे फुत्कार आहेत आणि " चांग भलं " च्या गजरांत अशुभ टिटवीचा भयकातर तारस्वरही आहे. यामुळे या ललितलेखांतील अनुभवांत एक प्रकारची विविधता आहे.

## " चंद्रबन"चा आंतरशोध

१. " मस्करीचे दिवस " या पहिल्या लेखांत लेखकाने आपल्या ढंगदार ग्रामीण शैलीत मस्कीरचे कांही अनुभव कथन केले आहेत. मस्करी माणसंच करतात असं नव्हे, तर मुकी जनावरेही करतात याचा एक अनुभवही लेखकाने सांगितला आहे. ही जनावरांची मस्करी पावसाळा संपायला येतो तेव्हा सुरु होते. तांबजाई देवीची यात्रा संपल्यानंतर शेंगाचे दिवस सुरु होतात. यावेळी आख्ख्या रानालाच मस्करी सुचते. ज्याचा भुईमूग पहिल्यांदा काढणीला येतो, त्याची दमछाक कशी होते हे सांगून लेखक मग मुलांच्या स्वप्नगरीचं -शेंगांच-वर्णन करायला लागतो. मुलांच्या गुप्त मसलती - मोर्चेबांधणी-शेवटी दगाफटका आणि घरच्यांचा मार अशा रीतीने शेंगाची मुलुखगिरी महागात पडते. तरीही शेंगाचे दिवस म्हणजे हुरुपाचे, रंगतीसंगतीचे उत्साही क्षण! शेंगा चाळायला बसलेल्या बायकांच्या वर्णनांत नलगे यांची काव्यात्मता प्रकट होते. करपाडीतलं खोपाड, पाखरं आंबेदारूल होणे, कक्कुटकोंबडा, तलफला होणे, निखळसंख रस्ता, शेंबडीमेकडी पोरं इ. भाषिक वैशिष्टयानी हा लेख न्यारा बनलेला आहे.

२. " झपाटलेलं रान " या लेखांत बादं -भैरु दरा, तिथला वारा, बायाची भीषण रात्र यांचं अद्भुत वर्णन लेखारंभी आलेलं आहे. शैलीच्या दृष्टीने बायातल्या विहिरींचं भयानक वर्णन नोंदण्यासारखं आहे. याच विहिरीत " म्हावसट" राहते. वर्षाला हमखास बळी घेणारी. बाद्यात सावरीची झाडं खूप. सावरीच्या वर्णनात लेखकाची निरीक्षणक्षमता दिसते. डोल्या उंबराच्या झाडा-वरील आग्या मव्हाची वस्ती, गवती रानातील साप, बाभळी आणि चिकाळू आंब्यावरील वानरांची वस्ती अशा रीतीने हा लेख पुढे सरकतो. फाकळ्या उंबराशी संबंधित एका व्यक्तिगत आठवणीने या लेखाचा शेवट होतो. उत्कष्ट वातावरणनिर्मिती हा या लेखाचा विशेष पण त्याचवेळेला लालित्य कमी वर्णनपरता जास्त !

३. " गावाकडच्या जत्रा " हा तिसरा लेख. ग्रामीण भागातील जत्रा, सणउत्सव ही श्रध्दाळू मनाची विरंगुळ्याची ठिकाणे होत. आपल्या संस्कृतीची ती अविभाज्य अंगे आहेत. नलगे यांच्या संस्कारक्षम वयांत या जत्रा-उत्सवानी त्यांच्या मनाचे भरणपोषण केले आहे. वारणाखो-यातल्या जत्रा महाशिवरात्रीबरोबर सुरुं होत. हिरवेपिवळे शिवार. वाटा भगव्यां पताक्यांच्या. परमेश्वराबद्दलची कृतज्ञता व्यक्त करणारा उत्सव म्हणजे महाशिवरात्र! कीर्तन, भजन आणि भंडारा यांनी नीकंठेश्वराचा परिसर खुलून जायचा. लेखकाने त्याच्या दोन मूर्तींचे विनोदी पध्दतीने वर्णन केले आहे. जत्रेत हमखास तमाशा. तमाशाचा तपशील नलगे चित्रमयपध्दतीने देतात. त्यामुळे त्यांत जिवंतपणा! जत्रेतल्या अनुभवांना आत्मीयतेचा, जिव्हाळ्याचा रंग आहे. नेमके आणि नीटस संवाद, बोलीभाषेचा वापर यामुळे अनुभवाला उत्कटता आली आहे.

४. " हवेतले झोके " यांत बालमनाची एक सार्वत्रिक प्रवृत्ती अभिव्यक्त झाली आहे. ही प्रवृत्ती-पतंग उडवण्याची आहे. लेखक च्या प्रारंभी लेखकाने आपल्या गावाचे सुरेख वर्णन केले आहे. धनगरटेकवरुन पतंग उडवले जात. ही टेकडी भरारा वा-यासाठी प्रसिद्द! या टेकडीवरुन लेखकाचा बालपणी पतंग उडविण्याचा हंगामा -हवेतला हा पहिला झोक ! दुसरा झोका उन्हाळ्यांत येणा-या मुठं पुनवेचा. पेटता मुद्रा अंगाभोवती फिरवत फिरवत डोंगर पेटविण्याची ही घटना अत्यंत रोमहर्षक आहे. त्याचं जोशिलं, रसिलं आणि नशिलं वर्णन लेखकानं केले आहे. पालखीतल्या देवाच्या शिकारीचा तिसरा झोका मिस्किल आणि नर्म विनोदी आहे. यावेळी बालमनाचे एक वेगळे दर्शन घडते. झोक्याची चौथी नोंद मोहरम सणामधील आहे. यावेळचे नलगे यांचे बालमन चिकित्सक आणि जिज्ञासू आहे. ते आपल्या दादाला भंडावून सोडते. पण दादाजवळ उत्तर नाही. एक रमतीगमतीचा ललितलेख !

५. " एक शापित स्वप्न" हा एक अत्यंत आगळावेगळा ललितलेख.यात लेखकाने प्राणीजीवन रंगवले आहे. कासव व मासे हे लेखकाचे लहानपणाचे दोस्त. त्याच्या लीलांचे अनेक त-हानी कौतुक नलगे यांनी या लेखांत केले आहे. सूर्योदयाबरोबर कासवांच जग जागं व्हायचं.ही कासवं तळयाजवळच्या धनगरटेकडीवरही जात. एक कासव चांदण्यातच बाहेर पडे अन् थेट देवळातील दगडी कासवांपर्यंत जाई. शाळकरी वयांतील कासवाबरोबरची खेळाखेळी नलगे यांनी बेमालूम वर्णिली आहे. एकदा कासवाच्या पिल्लाने कीर्तनांत जी धमाल उडवून दिली त्याची रंजक हकिकतही लेखकाने दिली आहे. खेकडा, कासव

100

आणि सापाचं पिल्लू, त्यांचं शाळेतील आगमन, गुरुजीकडून खावा लागलेला मार....या सगळया घटना आणि अनुभव नलगे यांनी विनोदी पध्दतीने सांगितले आहेत. तळयातील माशांचे, देवमाशांचेही वर्णन आले आहे. त्याबद्दलच्या आख्यायिकानी हकीकतीला गूढतेचा स्पर्श झालेला आहे. लेखाच्या उत्तरार्धात तळयालाही स्वतंत्र व्यक्तिमत्व असल्याची जाणीव वाचकानाही होऊ लागते. तळे, डोंगर, पिंपळाचे झाड, सूर्योदय, कमळफुले, तळयातील आकाशप्रतिबिंब हे सर्व जणू स्वप्न-महालासारखे लेखकाला वाटते. नलगे लिहितात - "दिवसभर माणसाच्या गर्दीत हरवलेलं तळं सांज झाली की कातर बनतं. धावत्या मेंढरांचा उडालेला आतुर गलका मंदावत जातो. गाईगुरांचे नुसते पाणावलेले हुंकार उरतात. चांदण-सावल्यांतल्या गुराख्यांचे आर्त हाकारे जातात लोपत. पाण्याची द-यात विरत जाणारी दूरची धून तळयाच्या काळजाचं पाणी करते. अस्वस्थतेची एक बारीकशी रेघ रंध्रांना उसवीत येते. खोल, खोल, अगदी खोल, मग उरतात ती वळणाच्या छायेत रिती डोंगरकडा, डोळे हरवलेले क्षितिज आणि उदास चंद्र.....असं हे आमच्या जीवींच्या नात्याचं ळं. पण हे तळं नुसतंच तळं नव्हतं. हे तर एक शापित स्वप्नच.आमच्या जीवाला आस लावणारं... काळजाला ताण लावणांर. नजरेपलिकडेपर्यंत हाक न पोचणा-या आमच्या थिटया जीवांचं शापित स्वप्न. अद्भुतांचं शापित कैवल्य!"[1] हे स्वप्नमहाल लेखकाच्या प्रौढपणीही मनांत कसं घर करुन आहे हे वरच्या उता-यावरुन कळून येईल. निसर्गजीवनाशी अकृत्रिम समरसता हे नलगे यांच्या ललितलेखनाचे वैशिष्टयच म्हणावं लागेल.

६. " चंद्रबनातल्या सावल्या " या ललितलेखांत चांदण्याच्या विविध त-हांचे वर्णन आले आहे. लेखकाला चांदण अत्यंत प्रिय.

" चांदण्याच्याही अनेक त-हा. कधी प्रसन्न टिपूर बनतं. कधी दाट कधी विरविरीत. कधी वेडाचा झटका यावा तसं बोलकं होतं. कधी नशापाणी केल्यागत वागतं. काहीबाही बरळत राहतं. कधी इतकं हसरं बनतं, की हसता हसताच टचकन त्याच्या डोळ्यातनं पाणी यावं. कधी काळसर छटा लेवून रुसवाफुगवा करतं. कधी कधी एखादी कहाणी सांगायला बसावं तसं धीर गंभीर बैठक मारुन बसतं.... कधी जत्रेतला तमाशा बघायला गावोगावची माणसं संगतीला घेऊन येते नि आपणाच सगळ्यांपुढं जाऊन नाची बघायला बसतं.... रानारानांत घुमेल अशी शीळ घालतं. पार नादावून जातं. कधी नाथाच्या यात्रेला जायला पाठीवर पिशवी मारुन लहान पोराच्या उत्साहात रात्रभर चालत असतं. परततांना मध्येच लग्नाच्या वरातीत घुसते. नवरा-नवरीऐवजी आपणाच घोडयावर बसून मिरवत असतं.....नारळी पोर्णिमेला समुद्रातला नारळ मनापासून पुजतं नि कोजागिरीला चक्क दूध पीत बसतं. संक्रांतीला तिळगूळ वाटून जोतिबाच्या यात्रेला निघतं. दिवाळी, महाशिवरात्र, नि गुढी पाडव्याला आपल्या घरी जाऊन पोराबाळांत सण-साजरं करतं." [२]

चांदण्याचं वरील वर्णन किती काव्यात्म आणि प्रसन्न आहे! उन्हाळ्यातील चांदणं म्हणजे सावरीच्या फुलाचा रेशमी कापूस. चांदण्या रात्रीचे घराघरांतील मनसुबेही लेखकाने खुमासदारपणे बोलीभाषेच्या ढंगदार संवादातून वर्णिले आहेत. चंद्र वर येत राहतो. चांदण्यांतील गलका विझत विझत गेल्यासारखा होतो. पोरांची पेंग मानेवर बसलेली असते. अंगणांतील बायका पेरीडच्या डोंगरातील खुनाबद्दल बोलू लागला नलगे यांच्या बालमनापुढे हा खून अद्भुतता पेरु लागतो. यातच त्यांची आई शेतावरील दादाचं रात्रीचं जेवण घेऊन जायला त्याला (नमाद्या म्हणजे लेखकाला) फर्मावते. घरापासून शेतापर्यंतचं यावेळेचं रानाचं वर्णन म्हणजे भय आणि अद्भुताचं मिश्रण होय. कोल्हेकुई, खुरटया झुडपांचा माळ, घुबडाचा चीत्कार, घोरला ओढा, खुनी शिवंचा

ओढा, वाघाची घळ आणि मरीआईचा गाडा या सर्वांच्या संमीलनाने चांदण्या रात्रीला भयाद्भुताची झिलई चढते. नमाचं सर्वांग पाणी पाणी करणारा हा अनुभव आणि नंतर " असल्या वाटनं एकटाच आलास रं लेका " ही दादाची साद, नमाचा जीव भांड्यात पडतो. उत्कृष्ट वातावरणनिर्मितीच्या दृष्टीने हा लेख पुन्हा पुन्हा वाचनीय झाला आहे.

७. " आणखी एक जटायू " यांत " सित्या वडारा" चं व्यक्तिचित्र आलेलं आहे. व्यक्तिचित्रं दोनप्रकारची असतात. एक खरीखुरी, वास्तवातली आणि दुसरी कलात्मक, वास्तवाचा आभास निर्माण करणारी. सित्या खराखुरा. लेखकाच्या गावचा लेखकाच्या बालपणातला. कांही वर्षे लेखकाला भारावून टाकलेला. त्यामुळे लेखकाने हे व्यक्तिचित्र जिवंत, समरसून अगदी ठाशीवपणे चितारले आहे. लेखक लिहितो,- " सित्या होताच तसा छप्पन्न गुणी...साडेसिटलीचा...अडगरा...ठेंग्याला उभा आडवा चिबडागत भरल्याला....टकरीचा बकरा असावा तसा...पायाच्या पिंड-या म्हणजे अगदी तट्ट...दंडाच्या बेडक्या हया फुगलेल्या. सुतकीनंच पिंड घडवावा असा चिवट, नुसता दगडी...मुस्काड तर अठीव हनुमंतांची रग ठसठसून भरल्याली. ठार काळा."[3] आडमाप ताकदीचा, भरउन्हात सुतडीनं कातळ फोडणारा, घुबडाचं मुकं घेणारा, ल्हावसटीच्या झाडावरील आंबा आणणारा, कुत्र्यांची मस्ती उतरविणारा., उभ्या गावाची महापुराची भीती घालविणारा - असा सीत्या अनगड. तितकाच कल्पक, मिस्किल आणि विनोदीही. एकदा त्यांने खाणीत जमिनीला भोके पाडून, जोरानं फुंकून गावाची तारांबळ उडवून दिली. पण परोपकारी, हरकाम्या, सगळ्या मुलांचा लाडकादोस्त. नडल्याअडल्यांचा मुराळी. एकदा नाटकाचं वेड घेतलं. " रामरावणयुध्द " सादर करून मोकळा झाला . त्या नाटकात

त्यानं जटायूची भूमिका केली होती. सीतेला पळवून नेणा-या रावणा-कडून पंख उपटला गेलेल्या जटायूची. नंतर त्याला नवीन वेडाने घेरले. गावात मुलांची प्रभातफेरी काढू लागला. तिरंगी झेंडा मिळविला . पांढ-या टोप्या गोळा केल्या. गो-या साहेबाला समुद्राच्या पार हाकलून द्यावचं आहे, असं तो म्हणायचा. " लेंगे, स्वराज्य लेंगे, च्या घोषणा घुमवायचा. भांडवलशाही, सावकारशाही ! आता ठेवा ची नाही हो ! ठेवायची नाही !! " म्हणायचा. एकदा प्रभातफेरी निघाली होती. " पार करो ! पार करो दर्या पार करो " सीत्या गर्जत होता. तेवढयात सोजिर आले. सित्याने तिरंगा घट्ट धरला. सुरुंगाची दारु ठासून भरलेली नळकांडी त्यानं पेटविली . सोजिरांची घोडी उधळली गेली. सित्याला धरुन न्यायला गोरी पलटण येणार अशी वार्ता वा-यावर होती. खरंच एक दिवस टापांच्या आवाजानी गाव थरथरुन गेलं. पण रात्रीच केव्हा तरी सित्याचं बि-हाड गाव सोडून गेलं होतं. फक्त वडारी गाडयांच्या धावा मातीवर उमटल्या होत्या. तेवढयाच खुणा. खुणांचा शोध घेत सोजिर फिरले माळरानावर. तिथं दिसलं प्रेत. तो होता खून, सित्याचा - नव्हे पोस्टमनचा. फितुरीचा ! नंतर बातमी फुटली. पोस्टमनचा खून सित्यानंच केला. पोस्टमन ठाण्याच्या गो-या साहेबाला बातमी पोचवतहोता. चहाडी करीत होता. प्रभातफेरीची ! तिरंगी झेंडयाची ! पुढं सित्याचं काय झालं ? - लेखक लिहितो -

" पण तिरंगी झेंडा दिसला की सित्याची आठवण मनाला विरघळून टाकते. वर्षे लोटली. तिरंगी झेंडा दिसला की सित्याची आठवण मनाला विरघळून टाकते. वर्षे लोटली. नवेनवे झेंडे घोषणा देऊ लागले. पण जटायूची पंख लावलेला सित्या कुठं दिसलाच नाही. कुणी म्हणतं, तुरुंगात मेला. कुणी म्हणतं, फकीर झाला, पण एवढं निश्चित , रावणाचा अंगठा फोडण्याचं बळ त्याच्या पंखात होतं ! "[४]

एक हृदय, ठसा उमटविणांर, संवेदनशील व्यक्तिचित्र [ लालित्यात आ रपार बुडालेलं ! अशा कैक अनगड, गरीब सैनिकांच्या बलिदानामुळेच आज आम्ही सुटाबुटांत " स्वातंत्र्य " उपभोगतो !!

८. " ढोळे वादळाचे " या ललितलेखांतहि एक व्यक्तिचित्र आले आहे, लेखकाच्या मामाचे. सखामामाचे. ताकभात कालवून खाण्याच्या वेळेपासूनचा सखामामाच्या लेखकाशी परिचय. लेखकाच्या मनांत, अगदी लहानपणी सुखामामानं धींचा दिल्याची आठवण आजही ताजी आहे. ही आठवण सांगता सांगताच लेखक सखामामाच्या रंगारूपाची ओळख करून देतो. मामाला ऊन ऊन दुधात फणसपानांत शिजविलेली वाळकं कुस्करून खाण्यांत भारी हौस. मामा धाडसी, ताकतवान. वाकोबाच्या ओढयाला पूर आला, की त्या प्रचंड प्राणलोटाला मामा लीलया खेळवायचा, वादळी पाणलोट पाहिला, की त्यांच्या अंगात वादळ शिरे. मामाचं घर वाकोबाच्या मंदिराजवळ, ओढयाजवळ, मामामुळे ओढयाची भीती गावच्यांना राहिली नव्हती. हा ओढा म्हणे खविसाचा. मामामुळे लोकांच्या मनातला खवीस कुठंच्या कुठं पळाला. वाकोबाच्या जत्रेत मामा दांडपट्टा खेळू लागला, की बघत रहावं. स्वातंत्र्यप्राप्तीसाठी अनेकानी अनेक मार्ग हाताळले. यांतले कांही मार्ग वारणाखो-यातही पोहोचले. मामा भूमिगत झाला. स्वराज्यप्राप्तीसाठी तारा तोडणे, चावडया लुटणे वगैरे प्रकार भूमिगतांनी सुरू केले. एके दिवशी मामा भर रात्री लेखकाच्या घरी आला आणि वीसेक भाक-या घेऊन गेला. दुस-या दिवशी शेजारच्या गावची चावडी लुटल्याचे कळलं. गोरे सोजिर भागांत घुसले. एका बाजूला हे देशभक्त, भूमिगत, आणि दुस-या बाजूला ! संधीचा, धामधुमीचा गैरफायदा घेऊन गरिबाना

लुटणारे,

खंडणी वसूल करणारे कोयासारखे लुटारु, दरोडेखोर, पाटलाकडच्या खंडणीच्या संदर्भात सखामामा कोयाच्या पायात पाऱ्या ठोकल्या. भूमिगतांच्या नावावर खंडण्या वसूल करणे सखामामाला पसंत नव्हते. ह्या पाऱ्याप्रकरणानंतर सखामामा भूमिगताचा फरारी झाला. तो सरकारला हवा होता. कोयाही ईर्षेला पेटला होता. सखामामानं मल्हारीला वाचवल्यानंतर कोयानं, मामाच्या गैरहजेरीचा फायदा घेऊन, त्याची बैलं, उभी पिकं आणि घरदार बरबाद करून टाकलं. स्वातंत्र्य मिळालं. मामाच्या घराला अवकळा आली होती. सखामामानं कापलेला कोयाचा पाय वाळत चालला होता. यावेळच्या सखामामाबद्दल लेखक लिहितो - "चिवाटीचा कोंबच मोडून पडावा तसं झालं होतं". काळ बदलला होता. गांधीजींच्या अनुयायांचे आवाज गोठले होते. भलतेच लुंगेसुंगे गादीवर चढले होते. उलटं वारं वाहत होतं. मामाच्या अंगातलं वादळ पंडया रोग झाल्यासारखं विझत चाललं. घराला सोबत म्हणून मामानं लग्न केलं. पण मामाचा जीव उभं वारं सुटल्यासारखं झालेला. " सुटलेल्या वाकाला चिलबिलून किती पीलबिलणार? " या एकाच प्रतिमेतून नलगे मामाचं चित्र उभं करतात. एकदा लेखक तुळशीबारसंच्या वेळी मामाच्या गावाला गेला. मामाच्या दाराला कुलूप. देवळांत दिपमाळेजवळ मामा कुठं दिसेना. " त्यो बगा त्या हाटिलात असलं " शेवटी एकानं सांगितलं. हॉटेलांत मामा गल्यावर. ध्यान दुसरीकडेच. भाच्याला ओळखेना. मामा बेडकासारखा झालेला. फणसपानातील वाळुकांच्या वासानं मामा उमलत गेला. ओळख पटल्यावर मामा ओरडला - " तुझ्या मामाचं भूत उरलंय, नुसतं भूत ! मामाच्या थरथरत्या खांधावरुन लेखकाला पाण्यानं डबडबलेले दोन डोळे दिसले... काळेभोर ...

ते डोळे होते गि-हाईकासाठी स्टोव्हवर चहा उकळत ठेवलेल्या मामीचे [ एका सच्चा स्वातंत्र्यासैनिकाचे हे खरेखुरे व्यक्तिचित्र काळीज गलबलवून टाकते. तरीही लेखन कुठेच भावविवश होत नाही. लेखकही फारसे भाष्य करीत नाही. मौन हेच येथील तुफान व्याख्यान ठरते.

९. " वळण" मधील लेखक मोठा झालेला आहे. नावलौकिक मिळाला. " निशांत " नांवाचा बंगलाही बांधला. पण हया बंगल्यात लेखकाला विरंगुळा नाही, मनाला चैन नाही, कसली तरी उदासी पछाडून राहते. काय हरवलंय हे कळत नाही. अशा मनोवस्थेतून हा नागर भाषेतील ललितलेख आकाराला आलेला आहे. सर्व फुलझाडे असूनही बाग उदास. म्हणून लेखकाने आईवडिलांची आवडती - निरगुंडी व जाईजुई लावली. लेखक कुरूंदच्या शाळेचा विद्यार्थी. नावलौकिक मिळविला म्हणून शाळेच्या नवीन इमारतीच्या शुभप्रवेशाचे निमंत्रण त्यालाच मिळते. आपला दोस्त शंकरूबरोबर लेखक तिथे जातो. दोन मित्रांची हृदयस्पर्शी आठवण म्हणजे हा ललितलेख.लेखकाच्या लहानपणी गरिबीमुळे उन्हातून अनवाणी पायाने येणा-या लेखकाला शंकरुने आपले चप्पल दिले होते. ते लेखकाने अजूनही जीवेभावे जपून ठेवले होते. शंकरूबरोबरची मिरवणूक एका वळणावर आली आणि लेखक एका आठवणीने झपाटून गेला. त्या वळणावर प्राजक्ताच्या झाडाखाली प्राजक्त फुलांत झाकून एस, एस. सी फॉर्मचे पैसे सुनीतांनं दिले होते. शाळा रंगवून आलेल्या पैशाने शंकरूचा फॉर्म आणि सुनीताच्या पैशाने स्वत:च्या फॉर्म. लेखकाने भरला. सुनीतानं पैसे का द्यावं ? काय संबंध ? परत धायला गेल्यावर शपथ का घातली ? हे कसलं नातं ? कसले भावबंध ? आणि कां ? लेखकाचे हे सर्व प्रश्न अनुत्तरीत आणि सुनीता ? " प्राजक्ताखालच्या विहिरीत तिचं प्रेत मिळालं लोकांना. पदरात बांधलेली फक्त प्राजक्तफुलं मिळाली " शंकरूच उत्तर. शेवटी लेखक लिहितो - " त्या वळणावरच्या प्राजक्ताची फांदी हवीय मला.मला

माझ्या बागेत लावायचीय. तीही याच वळणावरची ".[5] या भावपूर्ण ओवटाने हा लेख काळजात कल्लोळ उठवितो.

१०. " लाल डोळ्याचा माणूस " या ललितलेखात गुंजाबुवा या लाल डोळ्याच्या माणसाचं सखोल जीवनदर्शी व्यक्तिचित्र रेखाटण्यात आले आहे. डोंगराच्या खिंडीत कळंबाच्या झाडाखाली तेलकटलेल्या लाडोबाच्या मंदिरांत गुंजाबुवा रहायचा. जटांच्या बुचडा बांधलेला, भगवी कफनी घालणारा, लाल गुंजेसारखा डोळे असलेला गुंजबुवा एकटाच त्या भयाण डोंगरांत लाडोबावर वस्तीला असायचा. त्याच्या गळयाच्या दोरीत वसलीशी धुळपट बरीकशी हाडे होती. ह्या हाडामुळं भुताखेतांच झोटिंगच, म्हावसटीचं भय रहात नाही असं गुंजाबुवाचं म्हणणं. त्यामुळे डोंगरतळाच्या लोकांकडून वारंवार त्याला निरोप जायचा - " याक हाड पैदा करून ठेवा". खिंडीतनं आल्याड पल्याड होणारं माणूस, देशावरचे धनगर गुंजाबुवासाठी खायला कांहीतरी ठेवत. गुंजाबुवा कळला त्यांना त्याच्या लाल डोळ्यांतील भाव कळत. नवखा माणूस चांगलाच पारखला जाई. मंजाआऊच्या घरची चोरी गुंजाबुवाने पकडून दिली. गुंजाबुवाला पळस फुलण्याचे दिवस फार आवडायचे. एकदा एका नागझरीच्या काठावर तो फुललेला पळस पहायला आला असतांना फौजदाराने हटकले, आणि एक खून उघडकीस आला. गुंजाबुवाच्या अक्कलहुषारीमुळे घंटीवाल्याचा खून डबीवाल्यानं केला हे सिध्द झालं. त्याच्या स्वभावाचं वैशिष्टय म्हणजे तो गरीब असला तरी लाचार नव्हता. म्हणूनच त्याने फौजदाराची " बक्षिसी " नाकारली. त्याने आयुष्याचे चढउतार पाहिले होते, कडूगोड अनुभव रिचवले, पचवेले होते. भिका-याच्या पालांत त्याचा बाप कोका वाजवून भिक्षा मागे. बाप फक्त कोकाच मागे ठेवून गेला. लहान असताना एकदा पंक्तीत बसलेल्या त्याला कानमुलात मारून कुरवाडयाने हाकलून दिलं. गुंजाबुवा दगडावर पडला. तेवढयांत कुणी-तरी त्याच्यावर कुत्रं घातलं. गुंजाबुवानं लाडोबाची खिंड गाठली.

तिथेच झोप लागली. लाडोबापुढच्या घंटीत जागा झाला. घंटीच्या सुरावर त्याची बोटेही कोकयाच्या तारावरुन फिरुं लागली. दोन वर्षानंतर कळलं - -"कानसुलात मारलेल्या माणसाची बोटं वाळीत निघालीत." " खिंडीत येण्यापूर्वी गुंजाबुवा किशा गोसावी " या नांवाने ओळखला जात होता. एकदा कोका वाजवताना कळंबाच्या झाडाखाली बंग्या फासेपारधी आपल्या थोरल्या मुलीसह -रुखीसह आला. रुखी वाजवणा-या किशाकडे एकटक पहात राहिली. किशाच्या -गुंजाबुवाच्या-जगण्याला अर्थ आला. पण गुंजाबुवा लाडोबाला विसरु शकला नाही. पण घडू नये ते घडलं. ५/६ वर्षांनी रुखी एकाएकी नाहीशी झाली. गुंजाबुवानं लाडोबासमोर डोकं आपटलं. असंच एकदा नवरात्रांत मध्यानरात्री भेसूर वातावरणात कुणाच्या तरी कण्हण्याचा आवाज गुंजा-बुवाच्या कानी आला. त्यानं उठून, " कोण हाय " म्हणून विचारलं पण आवाज नाही, लाडोबाच्या उंब-याजवळ पुन्हा अस्पष्ट हालचाल आणि कण्हण्याचा आवाज आला. तिथे जाऊन गुंजाबुवानं हातातल्या वातीच्या प्रकाशात पाहिलं - रुखी होती ती ! ती फाटक्या कपडयांची, केसांच्या जटा झालेली., पांढ-या फटक कायेची, या जगात नसल्यासारखी, डोक्या-वर परिणाम झालेली. गुंजाबुवानं हंबरडा फोडला. त्याच रात्री देवापुढच्या घंटीचा टोल चोरीला गेला होता. गुंजाबुवानं रुखीला खूप समजून घेण्याचा प्रयत्न केला. तिला अंगभर डागण्यात आलं होत....आणि एकदिवस जैत्या भैरोपी आपले वाळलेले हात जोडून लाडोबासमोर हमसून हमसून रडत होता. गुंजाबुवानं त्याला ओळखलं. त्याच्या सा-या अंगालाच विस्तवाचे लाल डोळे फुटले ! गुंजाबुवा वाचकाची अनुभवकक्षा रुंदवितो यांत संशय नाही.

११. " रातवा" मध्ये लेखकाने ग्रामीण संस्कृतीचे यथार्थ चित्रण केले आहे. आधुनिक काळांत हरवलेल्या ग्रामजीवनाचा वेध घेण्याचा प्रयत्न यांत आहे. गांदुबुवा आणि कुशाबुवा या दोघा कोडेबहादुरानी

संस्कारजन्य वयात आपल्यावर संस्कार केले याचे लेखकाला आजही स्मरण आहे. त्यांची कोडी, त्यांच्या उत्तरासाठी अनेक ग्रंथधुंडाळणी यामुळे आपल्या बुध्दीचे क्षेत्र व्यापक झाले याची कबुली लेखकाने दिली आहे. चावडीतील अनुभव, शेळी चरायला नेतानाचे अनुभव अंगावर शहारे आणणारे आहेत. सुगीच्या दिवसांतल्या आठवणीही लेखकाच्या मनांत ताज्या आहेत. आज आधुनिकीकरणाच्या नावाखाली निसर्गाचे आणि त्याच्या अलौकिकतेचे रहस्य लोप पावत आहे, याबद्दल लेखकाला खंत वाटते. म्हणूनच मंतरलेल्या त्या दिवसांना आज आपण अंतरलो आहोत असे नलगे म्हणतात.

१२. एक अप्रतिम स्थलवर्णन म्हणून " गणेशगवंड : एक जरतारी पैठण " हा ललितलेख अभ्यासण्याजोगा आहे. एक निसर्गस्थळ, आपल्या रम्याद्भुततेसह कलात्मकतेचा सारा साज लेवून इथे - वारणाखो-यात उभे आहे. चंद्रकोरीवाकणासारखा असलेल्या, नितळ पाण्याच्या ख ळाळीच्या " गणेशगवंड" चे देखणे शब्द शिल्प चतुर शिल्पकाराच्या नजरेने कोरले आहे. शेरणाटया, पांढरे बगळे, मैंदरांचा घोळका, अल्लड पोरी, शेव-यांचा गच्च तट, दिलभरी हवा, पाण्यांत जाळं टाकून बसलेला कोळी, उौदांळात शिरणारा नाग, टिटव्यांचा गलका, खेकड्याची बिळं, नदीवरील मोटांचे करकर आवाज, पोपटांचे थवे आणि डोहाकाठचा आंबा या सर्व रौद्रसुंदर निसर्ग घटकांमुळे हा गवंड " अद्भुत " बनून गेलाय. शिवाय भरीला भर म्हणून म्हावसटीच्या, खविसाच्या दंतकथा चौमुलुखाच्या मुखांत असतात. अमोस्या-पोर्णिमेला गवंडावर पाच खणी, सात खणी, परड्या सुटतात. हा गवंड आगराळ-उभ्या उंच, कड्यांचा, लांबरूंद उभ्या उतरणीचा. पावसा-मुळ आलेल्या पुराला पहिलं खिंडार पाडतं ते गणेश गवंड . जगबुडीची भीती नाहीशी होते. सगळया गावांना वाटा या गवंडातून फुटलेल्या, अनेकांची अनेक प्रकारची नाती इथे जुळलेली. लहान मुलासाठी तर हा गवंड

म्हणजे " जादूची दुनिया " सुगीतली जत्रा गवंडच्या वाटेने गावात येई. पण लेखकाच्या मनांत एका वेगळया कारणासाठी हा गवंड कायमचा ठसून गेलाय. लेखकाचे वडिल - दादा - भारी कष्टी. त्यांचे वर्षाला ठरलेले नेम चुकायचे नाहींत. वर्षाला कोळंनरसिंगपूरच्या देवाजा जात. दुसरा नेम म्हणजे आगा शिवाला शेवटच्या श्रावण सोमवारी जाऊन यायचा. तेही चालतच. जातायेता या गवंडावर खळाळा हातपाय धूत. ओंजळभर पाणी पीत. लाल मातीच्या कडयाला पाठ लावून क्षणभर विसावत. पण त्या वर्षीचा तो श्रावण सोमवार चुकला. गौरीगणपतीसाठी दादा थांबले नाहींत. त्यामुळे लेखकाला " शेवटचा श्रावण सोमवार म्हणजे अवघा गवंडच" भासतो आणि वाटतं - " पैठणीच्या विणेची जरतार कुठेतरी उसवावी तसंच होऊन जात " ६ गवंडाशी निगडित असलेलं जनजीवन, दंतकथा आणि लेखकाची वैयक्तिक व्यथा यामुळे हे स्थलवर्णन ठाशीव व्यक्तिमत्वाचे बनले आहे. स्थलानाही एक व्यक्तिमत्व असते, याची प्रचीती यावी असा हा गणेश गवंड. नलगे यांचे गवंड " भोगणे " हे एका सर्जनशील, तीव्र गतिमान आणि संवेदनशील मनाचे " भोगणे" आहे. हे पानोपानी जाणवते एवढे निश्चित.

१२. " अक्षराचं बेट " या लेखांत विविध प्रकारच्या झाडाबद्दलचा जिव्हाळा अभिव्यक्त झाला आहे. देवळासमोरील बेलाचे झाड लेखकाच्या श्रध्दाशील मनाचे दर्शन घडवते. शाळेच्या चारी कोप-यावरच्या बोरुच्या बेटावरची अद्भुतताही लेखकाने चांगली वर्णिली आहे. शाळेपाठीमागील प्राजक्त तर रागावलेले गुरुजी आणि मुलं यांच्यात तह घडवून आणायचा. गुलमुसाची फुले तर लेखकाला अत्यंत प्रिय त्यांच्याबद्दलच्या आठवणी मोहक आहेत. या दृष्टीने लेखाच्या शेवटचं वाक्य बोलकं आहे. - गुलमुसाशिवाय उरलेला मी म्हणजे चांदणं हरवलेले आभाळ ।"

१४. " भुलावा " यांतही विविध प्रकारची झाडे आणि तत्संबंधीच्या आठवणी नोंदलेल्या आहेत. साताळीच्या पठारावरचं कंबळाचं झाड, बंफर, नारळ, सीताफळ, आवळा, बोर, कोवणी जांभूळ, अक्कलाचं झाड आणि आंबूतीच झाड यांच्या उल्लेखानंतर थोडयाशा विस्ताराने कोटरांतला आंबा, दिंडयाच्या वस्तीवरला वाघळाचा आंबा आणि न्हाव्याचा आंबा यांच्याशी निगडित असलेल्या वैयक्तिक आणि लोकभावना यांचा आढावा 'भुलावा' यांत घेण्यात आलेला आहे. " कोटरांतला ( स्मशानांतला ) आंबा गावच्या मावळतं अंगाला आणि न्हाव्याचा आंबा गावाच्या उगवंत बाजूला ! हा कसला योगायोगाचा लागाबंधा !! एक हिरव्या चुडयाच्या साक्षीदार तर दुसरा फुटलेल्या चुडयाचा साक्षीदार !! "[७] या वाक्यानी झालेला लेखाचा शेवट उदास पण तितकाच गडद गंभीर झालाय.

१५. बाळपावलांना ज्या " पाणंदी"ची ओढ वाटली आणि जी ओढ आज प्रौढपणीही तितकीच ताजीतवाणी आहे, त्या पाणंदीची " एक होती परी " अशी कल्पकतापूर्ण भलावण " एक होती परी " या ललितलेखांत केलेली आहे. अगदी बालपणापासूनच या पाणंदीच्या भोंतीनं असलेल्या शेवरीच्या फुलाबद्दल लेखकाला अतीव प्रेम. तेच प्रेम चिल्ला-याबाबतही. भयाची पहिली ओळखही पाणंदीतच झाली. दोरीलाच साप समजण्याचा प्रकार घडला. पुढे पाणंद कुठून, कसकशी पुढे सरकते याचं वर्णन लेखकाच्या बालपणासह शब्दबध्द होते. जगाची विविध रूपे पाणंदीन कशी दाखवली याचा आढावाही घेतला जातो. महापूर आल्यानंतर मात्र पाणंदीचे रूप बदलते. " मुडापण " झालेली ही पाणंद पाहून लेखकाच्या बालमनाची झालेली घालमेल चांगली अभिव्यक्त झाली आहे. ही पाणंद आईबरोबर बाजाराला गेली आणि मग बाजारातील कृत्रिम, बंदिस्त मानवी जग यांच्या कात्रींत सापडलेले लेखकाचे बालमन " एक होती परी "त चांगलेच प्रत्ययाला येते.

१६. " देवाचिये द्वारी " या ललितलेखांत धरणीकंपाने उद्ध्वस्त झालेले जीवन आणि तत्पूर्वीचे जीवनाचे मनोहर चित्र यांतील द्वंद्व शब्दांकित केले आहे. धरणीकंपानंतरची भग्नता मनावर अधिक परिणाम करते याचे कारण तत्पूर्वीचे शांत, आल्हादक आणि चैतन्य-दायी असे जीवनाचे चित्र लेखकाच्या मनासमोर तरळत राहिले आहे. देऊळ, चाफा, बेल, प्राजक्त, यांची वनश्री,

पहाटेचा चौघडा,

पालखी मिरवणूक, बेंदूर, गौरीगणपती यानी हे जीवन संपन्न होते. श्रावणातील पुराणे भक्तिभावाचा शिडकावा करून वेगळ्या विश्वांत नेत. पुराणकथांचे अद्भुत विश्व वेड लावायचे. देवळांतील अंधारी तिसरा मजला, त्याच्याशी निगडित आख्यायिका आणि देवळांतील पडव्या... सगळं गूढ वातावरण निर्माण करणाऱ्या. हे सगळे जमीन दोस्त होते आणि काळजांत घर करते. लेखकाचे मन नव्या वस्तूशी समरस व्हायला तयार नाही हे लेखाच्या उत्तरार्धात स्पष्ट होते.

तात्पर्य - "चंद्रबना"तील वरील सर्व लेखांतून आपल्याला वारणा खोऱ्यातील ग्रामजीवनाचे, ग्रामीण संस्कृतीचे विलोभनीय दृश्य दिसते. माणसं आणि निसर्ग यांचा परस्पर संबंध माणूस आणि त्याच्या काळा-तील घटनाप्रवाह, "वल्ली " ठरावयांत अशा व्यक्ती, अनोखे प्राणी-विश्व, अपरिचित पक्षीजीवन आणि आगळी, मराठीला संपन्न करणारी ढंगदार खास ग्रामीण बोली यामुळे हे सगळे ललित लेख सौंदर्यसंपन्न झालेले आहेत. नलगे यांच्या बालमनाने जो अनुभव घेतला - जी माणसं पाहिली, जो निसर्ग पाहिला त्याची चिंतन मननात्मक पुनर्निर्मिती.. " चंद्रबनात" झालेली आहे. प्रत्येक अनुभवाचा आकार वेगळा, आणि गंधही वेगळाच.

रम्याद्भुत निसर्गाच्या स्पंदनांचे चित्रण

पन्हाळा, मलकापूर, बिळाशी, बत्तीस शिराळा, चिखली, मांगरूळ, कोकरूड आणि भेडसगांव इ. गावानी वेढलेल्या परिसराला " वारणा खोरे " असे म्हणतात. वारणा नदी या खो-यातून वाहते. नदीकाठ व सहयाद्रीच्या डोंगरकडानी वेढलेला हा परिसर. या परिसरातील पशुपक्षी, येथील माणसे यांच्यातील भावबंध नलगे यांच्या ललितलेखनाचे विषय झालेले आहेत. निसर्ग हा मानवी जीवनाचा अविभाज्य घटक आहे. निसर्गाचे विविध आविष्कार मानवी मनांत भावतरंग निर्माण करतात. एखादा लेखक निसर्गाचे विविध आविष्कार अत्यंत, चपखलपणे, सूक्ष्मपणे, शाब्दबध्द करतो. रंगगंधाचे ऋतूंचे आविष्कार मानवी मनाला काव्यात्मकतेच्या पातळीवर नेतात. आणि मग तो मानवही भावपातळीवरुन या निसर्गाचा अनुभव घेऊ लागतो. नलगे यांच्याबालमनांत नेमकी हीच प्रक्रिया घडते. निसर्गाचे विविध आविष्कार, नलगे यांना लोभावतात.

मुळांत नलगे संवेदनशील वृत्तीचे, कविप्रवृत्तीचे लेखक, त्यामुळे निसर्गाचे विविध विभ्रम त्यांना विविध पातळयावरुन जाणवतात. नलगे यांच्या निसर्ग-रेखाटनांत मग ऐंद्रिय संवेदनांची बहार उडते. रम्य आणि भयकारी अद्भुत दोन्ही प्रकारचा निसर्ग नलगे यांना समानच भावतो. या संदर्भात डॅा. सौ. अर्चना ढेकणे लिहितात - " म्हणूनच त्यांना निळं आकाश भावतं. पानाफुलांच्या स्पर्शासाठी ते अधीर बनतात. नक्षत्रं त्यांना प्राजक्ताची फुलं वाटू लागतात. आजच्या धावपळीच्या जीवनातही त्यांना गावाकडच्या आठवणी साद घालतात. "[6] ग्रामजीवनांत निसर्ग हा महत्वाचा घटक. तेव्हा ग्रामसंस्कृतीशी निगडीत असलेला हा निसर्ग आपल्या विविध छटा घेऊन, स्वरूपे घेऊन, सा-या स्पंदनासह " चंद्रबना-च्या पानापानावर अवतरतो. " मस्करीचे दिवस " या लेखातील बाजिंदा पावसाचं पुढील वर्णन लक्षणीय म्हणावं लागेल. नलगे लिहितात - " पाऊस तसा बाजिंदाच दांडगा. आभाळासंग उगीचच झ्याझोंबा खातो आणि एकाएकीच थांबतो. चुकापपडीनं भाग

धरतो. कधी ढगाच्या सावलीला लोंबकळून खाली उतरतो, तर कधी उन्हाच्या जरतारी किरणांच्या खांद्यावरून उडी घेतो. ओढयावगळांनी ओसंडून वाहतो. दस-याच्या सोन्यांची भिंग राजवस्त्रांवर लगडून घेतो. खंडेनवमीला आपलीच भिजून चिंब झालेली वस्त्रं शमीच्या झाडावर वाळवत बसतो. निळाईजवळ तरंगणा-या पतंगाच्या शेपटीला धरतो. सर्कशीतल्या-प्रमाणे उलटे झोके घेतो. मग ढगांच्याच पायघडयावरून दिगंतापार होतो .[९]

उपरोक्त उता-यातील प्रतिमा कितीतरल आहेत. "झपाटलेलं रान " यांत निसर्गाच्या अद्भुत रूपाचे चित्रण येतं. 'एक शापित स्वप्न' या लेखात तळयालाही सचेतन रूप देण्यात नलगे यशस्वी झालेले आहेत. "चंद्रबनातल्या" सावल्या" या लेखांतील सुरवातीला आलेले चांदण्याचे चित्रण मखमाली झालेले आहे. " लाल डोळयाचा माणूस " मधील कळंबाचे झाड, जणु त्यालाही व्यक्तित्व प्राप्त झालेले आहे. " गणेश गवंड : एक जरतारी पैठण" मधील गवंड या स्थलाचे वर्णन अत्यंत कलात्मक आले आहे. "एक होती परी " मधील 'पाणंद' कुणाच्याही स्मरणांत रहावी अशी बेमालूम उतरली आहे. " ही पाणंद, लाजरीबुजरी, खारोटीसारखी, इतर पाणंदी असतात. कशा नटव्या, मुरडत, ठुमकत जाणा-या....नजर भुलव्या...पाय ... अंगझडी येणा-या ...लटकत भटकत जाणा-या. गरीब गाय नी पोटात पाय अशा...नाच-या थिरथि-या, वळणा आडवळणावर नजरबंदी कर-णा-या आणि खाली मुंडी पाताळ धुंडी नी सरळ चव्हाटयावर उभ्या करून चांदण्या दाखविणा-या, चिडखोर नी कागाळखोर पण आमची ही पाणंद म्हणाले लाखांत देखणी, शामळू नी बावरी अशीच. रेशमी पदराआडच्या काजळखो-या लाज-या पापण्यांची, कधी रात्री कुणाला न दिसेल असा चांदण्याचा गजरा माळी आणि निळया आकाशाच्या आरशांत स्वत:लाच न्याहाळीत असे. एकटी....अगदी एकटी ".[10] वरील उता-यावरून नलगे यांच्या निसर्गव्यवहाराच निरीक्षण किती सूक्ष्म आहे याची कल्पना येते. निसर्गघटकांशी नलगे यांचे बालमन कसे एकरूप व्हायचे, ते "देवाचिये द्वारी" या लेखातील देवळाच्या दारातला प्राजक्त फुलल्यानंतरच्या वर्णनांत दिसून

येते. नलगे लिहितात - "श्रावणातरी सोनेरी किरणांतून सळसळल्या की दारातल्या प्राजक्त फुलायचा. बहर फुलाकळयाशी यायचा. प्राजक्त फुलांची रासच्या रास अंगणभर, विखुरावयाची. या पांढ-याशुभ्र राशी-भोवती मन घुटमळायचं उत्कट बनायचं. सगळं पांढरशुभ्र दिव्यभव्यपण इवलाल्या डोळयाच्या कठांत साठवलं जायचं. फुलांचाच वर्षाव. फुलांचीच उधळण अंगणभर, प्रांगणभर"[11] निसर्गघटकांच सूक्ष्म अवलोकन, निरीक्षण आणि मग त्याशी तद्रूपता यामुळे या सर्व निसर्गचित्रणांना संवेदनशीलता प्राप्त झालेली आहे. ती वर्णने काव्यात्म बनून गेलेलीआहेत. हा वाङ्मयीन विशेष "चंद्रबनांतील सावल्या" कलात्मक दर्जा प्राप्त करून देतो. "इथं फुलांचे, पक्ष्यांचे, प्राण्यांचे इतके विविध निर्देश आणि तेही बावनकशी-नबंरी, ग्रामीण बोलीभाषेत सहज आले आहेत की वारणा खोरे न बघितलेल्याही वाचकाच्या डोळयापुढे ते खोरं टक्कनं उभं रहावं"[12] असे श्री. शिवाजी सावंत म्हणतात ते खरेच आहे. इजट, वानर, साळिंद्र, अस्वल, साप, मधमाशा कासव, विंचू मासे असे नानाप्रकारचे प्राणी "चंद्रबनांत" वावरतात. त्यांचे वावरणेही नाना प्रकारचे आहे. धनछडी खंड्या, टिटवी, वाघुळ, घुबडि, बगळे, कावळे आणि भोरडया या पक्ष्यांची हजेरी तर आहेच. निरगुंडी, जाईजुई, गुलमुस, आघाडा, प्राजक्त चाफा ही फुलझाडे, हिरवी गर्द शेतं, बोरु, बेल, कंबळ, बंफर, नारळ, सीताफळ, आवळा, जांभूळ, आंबुती, अक्कल आणि आंबा - अशी कितीतरी झाडे यांनी चंद्रबना"तील निसर्ग शोभिवंत झालेला आहे. एकूण लावण्यमयी निसर्ग आणि त्याला शब्दबध्द करणारी चित्रमय शैली हा "चंद्रबना"चा दुसरा लक्षणीय वाङ्मयीन विशेष म्हणावा लागेल.

## रेखीव व्यक्तिचित्रे

"चंद्रबनांत" अनेक व्यक्ती भेटतात. "गावाकडचे माती" या पुस्त-कांत ज्या अनेक व्यक्ती आपल्याला भेटलेल्या आहेत, त्या पुन्हा आपल्याला इथेही दर्शन देतात. पण इथले त्यांचे "दर्शन" ओझरते आहे. म्हणजेच

नलगे यांनी परिसर तोच ठेवलेला असला, तरी व्यक्तींची पुनरावृत्ती टाळलेली आहे. अन्यथा कलात्मक हानीचा दोष पदरी आला असता डोंबारी, माकडवाले, नंदीवाले, कुडमुडया जोशी, खेळणीवाले, लमाण-वंजारी, वासुदेव, तराळ, वैदू, दांगट यांचे उल्लेख " ओझरते " आणि " आवश्यक त्या ठिकाणी "च येतात. विशेषता सुगीच्या दिवसांत, जत्रा-उत्सवांत यांचे दर्शन आणि वर्णन अपरिहार्य ठरते. कारण यांच्याशिवाय ग्रामसंस्कृतीला पूर्णत्वच येऊ शकत नाही. "चंद्रबना" तही कांही व्यक्ती विशेषत ताई, अक्का, तमाशाशौकीन, कीर्तनकारबुवा, राऊदा, लेखकाची आई, मंजुआऊ, तानाक्का, केसूदादा, दिलीप, फोजदार, बंग्या फासेपारधी, आणि पुजारी वगैरे मंडळी प्रसंगोपात्र दर्शन देतात आणि निघून जातात. लेखकही ही पात्रे गंभीरपणाने घेत नाही. ज्यांना " दुय्यम " व्यक्तिरेखा म्हणतात येईल अशी कांही पात्रे "चंद्रबनांत " आहेत. या दुय्यम व्यक्तिरेखा स्वतःच्या वृत्तीप्रवृत्ती घेऊन येतात, थोडीशी छाप पडतात, लेखकांवर त्याच्या बालपणी कांही संस्कार करतात., त्याच्या मनाचा एक अगदी छोटयातला छोटा कोपरा व्यापून राहतात. यामध्ये लेखकाच्या शाळकरी मित्र शंकरु ज्याने गरिबीमुळे उन्हात अनवाणी चालत शाळेला येणा-या लेखकाला आपल्या पायांतील नवीन चप्पल काढून दिले ( वळण) पांडुबुवा आणि कुशाबुवा हे दोन कोडेबहादुर ज्यांनी संस्कारक्षम वयांत लेखकाच्या बुध्दीला धार लावली ( रासवा), जेवण घेऊन आलेलं पोरंगं हिरमुसलं होऊन परत गेलं, म्हणून काय लागलं औत एकाद दिवशी तर घेऊन येईल, पण कलिंगड पायजे बघ येक " असं गंपादाला म्हणणारे लेखकाचे दादा. ( चंद्रबनातील सावल्या ) वगैरे व्यक्ती मोडतात. पण ठळकपणे, दीर्घकाळ, स्मरणांत रहाव्यात अशा तीन

व्यक्तिरेखा नलगे यांनी फार सुरेखपणे रेखाटल्या आहेत.
निळया चंद्रबनांतील सीत्या वडार ( आणखी एक जटायु) सखामामा,
( डोळे वादळाचे ) आणि गुंजाबुवा ( लाल डोळयाचा माणुस ),
यातील व्यक्तिरेखा म्हणजे प्रभावी, दिलखेचक आणि भूलभुलैय्याच्या
चांदण्या होत. या तिनही व्यक्ती रेखीवपणे, त्यांच्या व्यक्तिमत्वाच्या
बारीक कंगो-यासह नलगे यांनी चितारल्या आहेत. सीत्या वडार
" जटायू " या एकाच प्रतिमेतून बोलका होतो, साकार होतो, " जटायू "
ही प्रतिमाच मुळी अत्यंत सूचक आणि अर्थगर्भ आहे. सीत्याचं सार जीवनच
या प्रतिमेतून मुखर करण्याचं कसब नलगे यांनी दाखवलं आहे. तसाच
वादळाचे डोळे असलेला सखामामा. महापुराचे पाणलोंटे, लीलया हाताने
खेळावयाचा " खेळवणे " या क्रियापदाच्या वापरांतून नलगे यांनी
त्यांच्या ताकदीतील सहजता अभिव्यक्त केली आहे. क्रांतीवीर नाना पाटील
यांच्या प्रतीसरकारात दाखल होउन, इंग्रजी सत्ता खिळीखिळी करणारा
लेखकाचा मामा ( आईचा भाऊ ) सखामामा, भूमिगतांचा गैरफायदा
घेऊन लूटमार करणा-या कोयाला चांगलाच हिसका दाखवतो. त्याचा
एक पाय कापून काढतो. या नाटयमय घटना केवळ स्वातंत्र्यप्रेमासाठी,
घरादारावर तुळशीपत्र ठेवून झालेल्या आहेत. स्वातंत्र्य मिळालं. पण
भलतेच लुगेसुंगे गादीवर चढले. मामातील वादळाला जणू अर्धांगवायू झाला.
" सखामामा" हे एक उत्कट, समरसून लिहिलेले व्यक्तिचित्र! प्राक्तन,
गरिबी आणि माणसाकडून झालेली फसवणूक यांतून फुलत आणि उमलत
गेलेले व्यक्तिचित्र म्हणजे जोडोबाचा एकनिष्ठ आणि अखंड उपासक गुंजाबुवा.
त्याची उपासना एवढी कडक, की त्याला छळणा-यांचे हात लाडोबा
वाळवी. डोळयांत भेदक तेज असलेला गुंजाबुवा, तर्कट बुध्दीचा पण या
तर्कट बुध्दीमुळे एक खून उघडकीला आला. " मुटक्याएवढा बुटकुळा
पंढरीच्या विठोबासारखा सावळा, वाढवलेल्या जटांचा मागे बुचडा बांध-
लेला, गोल चेह-याला बोलाईदार वाढलेली दाढी, हाततिरफे, पाय वाकडे,
कमानदार चिपतुळे चरकातून बाहेर पडलेल्या सपाट चिपाडासारखे, डोळे

लाल गुंजेसारखं कुक्कुड कोंबडयाचं असतात तसे, अंगावर भगव्या रंगाची मांजरपाटी कफनी, काखेत भगवीच झोळी, हातांत नागफण्याची लांबट छडी असं गुंजाबुवाचं एकूण ध्यान .[13] उपरोक्त ६/७ वाक्यांतूनच नलगे गुंजाबुवाला साकार- " मूर्तिमंत ( Concrete )करतात. अशा या गुंजाबुवाचे रुखीबरोबरचे भावसंबंध हे मुळातूनच वाचण्यालायक आहेत. नलगे यांच्या हया व्यक्तिरेखांचे चित्रण रेखीव, उत्कट, वास्तव, ठाशीव आणि भावशील असले, तरी हया व्यक्तींना समग्रता किंवा परिपूर्णता येत नाही. कारण ती " स्केचिस " आहेत. तुटक तुटक अशा कांही घटनाप्रसंगातून हया " स्केचिस " जन्माला आलेल्या आहेत. सलगता नसली, तरी " स्केचिस " म्हणून हया व्यक्तिरेखा तोलामोलाच्या आहेत हे निर्विवाद !

लेखनाला काळाचे परिमाण

" चंद्रबनांत " लेखकाच्या " गतस्मृती " साकार झालेल्या आहेत. लेखकाला आपल्या बालपणाविषयी नितांत ओढ आहे. त्याचे बालपण रसरसत्या निसर्गाच्या आणि जिवंत-जातिवंत माणसांच्या सहवासांत गेले. म्हणूनच या आठवणीत निसर्ग, व्यक्ती आणि स्वत: लेखक यांच्या परस्पर संबधांतील घटनाप्रसंगाचा तिहेरी गोफ विणला आहे. म्हणजेच या ललितलेखनाला संबंधित काळाचे भान आहे. या भानामुळे लेखनाशय सकस आणि समृध्द झालेला आहे. वर्ण्यविषयभूत काळापासून लेखक स्वत:ला अलिप्त ठेवू शकत नाही. लेखकाचे बालमन जिज्ञासू आहे. भोवताली जे घडते आहे, त्याचे त्याला भान आहे, ते मनांत नोंदवले जात आहे. नोंदवत असतांना कांही अन्वयार्थही लावलाजात आहे. ते त्याचे सखोल चिंतन नसेल ( बालमनाकडून ते अपेक्षितही नाही ) पण त्याची " जाणीव " आहे हे मात्र खरे. नलगेंचे बालपण स्वातंत्र्यपूर्वकाळात गेले. स्वातंत्र्यपूर्वकालांत भारतांत- पर्यायाने महाराष्ट्रात अनेक रोमहर्षक घटना घडत होत्या. ब्रिटिशाविरुध्द जोरदार उठाव सुरु झाला

होता. त्याचे पडसाद वारणाखो-यांतही उमटत होते. हे लोण - भूमिगताचे लोण खुद्द नलग्यांच्या घरांत पोचले होते. लेखकाचा मामा ( आईचा भाऊ ) सखामामा हा भुमिगत झाला होता. तारा तोडणे, चावडया जाळणे वगैरे प्रकार हे भूमिगत करीत होते. अपरात्री येऊन मामा भूमिगतासाठी भाक-या घेऊन जायचा (डोळे वादळाचे) भूमिगताबरोबर, त्यांच्या नांवाचा गैरफायदा घेऊन लुटमार करणा-या कोयासारख्या दरोडेखोराच्या उल्लेखहि डोळे वादळाचे या ललितलेखात आलेला आहे. याबद्दल सखामामाने कोयाला शिक्षाही केली. स्वातंत्र्य मिळाले. पण खरे देशभक्त बाजूला राहिले. सखामामा विझत चालला. याबद्दल नलगे तीव्रतेने, उपरोध, उपहास ही शस्त्रे काढून लिहीत नाहीत पण अत्यंत सूचकपणे नलगे सखामामाच्या उत्तरायुष्याकडे वळतात. "आणखी एक जटायू " मधला " सीत्या" वडारही बेचाळीसच्या क्रांतीमधला. गांधीजींच्या आदेशानुसार तो प्रभातफेरी काढायचा. भांडवलशाहीविरोधी कवनं म्हणायचा. दारूच्या नळकांडया फोडून इंग्रज सोजिरांची घोडी उधळायचा. पण देशबांधवाच्या फंदफितुरीने तो पकडला गेला. पण तिरंगी झेंडा पाहिला, की लेखकाला सीत्याची तीव्रतेने आठवण येते, आज प्रौढपणीही. सीत्या कुठे ? कोणत्या समुद्रात ? कुणालाच माहीत नाही. पण नवनवे झेंडे मात्र मिरवताहेत ( आणि भूकंप झाल्यानंतर देवळाचा विध्वंस पाहून लेखकाचे अंत:करण गलबलून आले. ज्याच्या सावलीत उभागाव आजपर्यंत तगला, सावरला, पिढयान् पिढया वाढल्या तीच सावली आता कोसळू पहात होती. भूकंपापूर्वीचे गावजीवनाचे रम्योदात्त चित्र लेखकाच्या नजरेसमोर तरळू लागले. ( देवाचिये द्वारी ) या उपरोक्त सर्व घटनाप्रसंगाना वास्तवाचा स्पर्श आहे. हे घटनाप्रसंग लेखनांत सहजपणे गुंफले गेले आहेत. कोणत्याही प्रकारची तीव्र, कडवट प्रतिक्रिया व्यक्त न करता नलगे स्वाभाविकरित्या हे घटनाप्रसंग नोंदवत जातात. त्यामुळे पाल्हाळ आणि अनावश्यक चिंतन टळून लेखन कमलीचे सूचक बनले आहे. काळाच्या भानामुळे त्याच्या परिस स्पर्शामुळे लेखनाला जिवंतपणा आलेला आहे. बेचाळीसच्या

क्रांतीघटनामुळे या ललितलेखांना एक सामाजिक संदर्भ प्राप्त झाला आहे.

ग्रामसंस्कृतीच्या विविध पदरांचे दर्शन

" चंद्रबनांतील सगळे ललितलेख ग्रामसंस्कृतीशी निगडित आहेत. लेखकाचे बालपण खेड्यांत गेल्यामुळे, या संस्कृतीशी त्याचा जवळून घनिष्ट संबंध आहे, ही ग्रामसंस्कृती आधुनिक काळांत हळूहळू नष्ट होत आहे. पण ही संस्कृती लेखकाच्या रोमरोमांत भिनलेली असल्यामुळे, त्याला त्याची नितांत सुंदर ओढ आहे. या ओढीतूनच या स्मरणजन्य ललितलेखांचा जन्म झालेला आहे. प्रौढपणीही लेखक गावाकडील " चंद्रबन " विसरु शकत नाही . त्या बनातील सावल्यानी त्याच्या काळजात घर केललं आहे. या बनांतील एकेक लेख वाचतांना ग्रामसंस्कृतीचा कोणता ना कोणता तरी पदर उलगडत जातो. गाव ज्या परिसरांनी वेढलेला असतो त्या परिसराचं दर्शन आपल्याला " झपाटलेलं रान" या ललितलेखांत होतं. ग्रामसंस्कृतीत पावसाळ्याचे दिवस म्हणजे मस्करीचे दिवस". मस्करी केवळ माणसेच नव्हे तर जनावरेही करतात. या जनावरांच्या मस्करीचे खुमासदार वर्णनही येथे आपणांस वाचावयास मिळते. " गावाकडच्या जत्रा" म्हणजे उत्साहाला विशेषत: बालमनाला उधाणच. नीलकंठेश्वराची तांबजाई देवीची जत्रा बिळाशीची जत्रा, लाडोबाची जत्रा, शिवरात्रीची जत्रा, वाकोबाची जत्रा यांनी हे ललितलेख गजबजून गेले आहेत. सणउत्सवाला तर तोटाच नाही. नागपंचमी, गौरीगणपती, दसरा दिवाळी, मदंपुनवेचा खेळ, धुळवड, रंगपंचमी इ. सणामुळे ग्रामसंस्कृतीत चैतन्याचं वारं शिरतं सुगीतील शिवार म्हणजे मूर्तिमंत चैतन्य, यावेळचे सारे अनुभव नलगे यांनी जिवंतपणे शब्दबध्द केले आहेत. गावगाड्यांतील श्रध्दा, अश्रध्दा, आणि अंधश्रध्दा भुते, ल्हावसट, खविस आणि मरीआईचा कोप यांचे अद्‌भुत आणि भयकारी चित्रण या ललितलेखांना एक वेगळीच रंजकता प्राप्त करुन देते. पांडुबुवा, कशाबुवासारखी बेरकी हिकमती माणसे, सखामामासारखा तालेवार माणूस, सौल्या गुंजाबुवासारखी

रम्याद्भुत वल्ली आणि ग्रामजीवनांतील बाराबलुतेदार, नेमानं सुगीत उगवणारी वासुदेव, डोंबारी, मुंबईवाला, कैकाडी, माकडवाले, इ. शेकडोबारी माणसांनी " चंद्रबन " समृध्द झालेलं आहे. पाणंद, गणेशा-गवंड, लाडोबाची खिंड आणि आरस्थानी तळं, पतंगउडवायचा धनगर टेक इ. निसर्गघटक ग्रामसंस्कृतीला रमणीय सौंदर्य बहाल करतात. तात्पर्य ग्रामसंस्कृतीच्या चित्रणाने नागर ललितलेखाचा " कॅनव्हास " नलगे यांनी विस्तृत केलेला आहे.

" चंद्रबन"ची वाङ्मयीन विशेषता

गतस्मृतींची ओढ, काव्यात्मता, उत्कटता, चिंतनशीलता आणि जीवनानुभवाची खोली हे ललितगद्याचे विशेष म्हणून मान्य झालेले आहेत. आणि हे सर्व " विशेष " नलग्यांच्या " चंद्रबनातल्या सावल्या" या पुस्तकांतही कमीअधिक प्रमाणांत आढळतात. हे सगळेच लेखन पूर्वस्मृतींची मननात्मक पुन:निर्मिती आहे. " लेखकांचं बालपण व बालपणीचं दूर गेलेलं मनोरम जग लेखक विसरु शकत नाही. परंतु बालपणांतील, त्या जीवनांतील " चंद्रबनाच्या सावल्या " मात्र लेखकाच्या स्मृतीवर आपले गडद ठसे उमटवून गेल्या आहेत. आणि लेखकाने स्मृतिकोषांतील त्या सावल्यांना अत्यंत बारकाव्यांसह व तपशीलासह या लेखांमधून चित्रित करण्याचा प्रयत्न केला आहे. बालपणीच्या बालमुठीतून जगल्या भोगल्या क्षणांना लेखक आपल्या-पासून दूर जाऊ द्यायला तयार नाही, " असं जे प्रा. साहेब खंदारे म्हणतात ते वस्तुस्थितीला धरुनच आहे. ही स्मरणे म्हणजे नलगेच्या " जीवींच्या जिव्हाळा" आणि म्हणूनच त्यांच्या अभिव्यक्तीत उत्कटता आली आहे. मूळ अनुभव उत्कट असल्याशिवाय त्याची अभिव्यक्ती उत्कट होऊ शकत नाही. नलगे अनुभव भोगतात ते उत्कटतेने त्यामुळे साहजिकच लेखनांत पुरेपूर उत्कटता उतरते. यामुळे " चंद्रबन " उत्कट झाले आहे. शिवाय नलगेंचा लेखनपिंड काव्यात्म मनोवृत्तीचा असल्यामुळे हे सगळे लेखन रसभरीत उतरले आहे. पावसाचे वर्णन असो, पाणंदीचे वर्णन असो किंवा तळ्याचे वर्णन

असो किंवा सुगीतील शिवाराचे वर्णन असो ही सगळी वर्णने काव्यमय उतरली आहेत. नलग्यांची कल्पकता रौद्र आणि रमणीय दोन्हीत आपला तितकाच विलास दाखवते. काव्यात्मता हा नलगेंच्या ललितलेखनाचा एक प्रभावी गुणच बनून गेलाय. ही काव्यात्मता म्हणजे केवळ कल्पकतेची भरारी नव्हे. त्याला वास्तवस्पर्श आहे. हा स्पर्श चिंतनामुळे आलेला आहे. हे चिंतन मात्र बालमनाचे आहे ( ही मर्यादा आपण ध्यानांत ठेवली पाहिजे ) हे चिंतन तार्किकाच्या निसरडया पायवाटेचे नव्हे . ते आहे काव्यात्म ललितगद्य लेखकाचे. त्यामुळे ते सखोल न बनता सूचक बनते. सीत्या, सखामामा, गुंजाबुवा, धरणीकंप, दोन पितळी देव किंवा हवेतले झोके या ठिकाणचे चिंतन पहावे म्हणजे हा मुद्दा स्पष्ट होईल. अनुभवाच्या संदर्भात असे म्हणतां येईल की, बालकाचे विश्व मर्यादित अनुभवाचे असते. " चंद्रबना"तील अनुभवविश्व एका बालकाचे असले तरी त्याचा पट खूप विस्तृत आहे असं म्हणावं लागेल. आणखी एक जटायू " 'डोळे वादळाचे' " आणि " लाल डोळयांचा माणूस " हे तीन ललितलेख या दृष्टीने खूप बोलके आहेत.

## अस्सल ग्रामीण शब्दकळेची भाषा

" चंद्रबन"च्या निमित्ताने नलगे यांनी मराठी वाचकापुढे एक खास नजराणा ठेवलाय. तो म्हणजे भाषिक विशेषाचा. हा विशेष फार मोलाचा आहे. " च्याचला " रांडच्या" वगैरे शब्द वापरले म्हणून कोणती भाषा ग्रामीण ब त नाही किंवा लेखकही ग्रामीणलेखक ठरू शकत नाही. अनुभवाच्या आचेतून अभिव्यक्तीचा स्वत:चा विशिष्ट घाट घेऊन जेव्हा हे शब्द लेखनांत येतात तेव्हाच ग्रामीण भाषेचा जन्म होतो. अशीच ग्रामीण भाषा- निवेदनाची, अभिव्यक्तीची भाषा म्हणून नलगे यांनी चंद्रबनांत

योजिली आहे. ही भाषा ग्रामसंस्कृतीतून सहजतया उमलून आलेली आहे. या ललितगद्यात अभिव्यक्त झालेल्या अनुभवाचीच ती भाषा आहे आणि म्हणूनच ती रसरशीत बावनकशी ग्रामीण आहे. अनोख्या अनुभवाना अस्सल ग्रामीण शब्दकळेचे कोंदण लाभलेले आहे. या भाषेबद्दल लेखनशैलीबद्दल शिवाजी सावंत लिहितात - " लेखक चंद्रकुमार नलगे यांची भाषा संपन्न व निष्ठा, परिश्रमपूर्वक त्यांनी कमावलेली अशी त्यांची म्हणून एक साजिवंत लेखनशैली इथं पानापानावर प्रकर्षाने जाणवते. इतरत्र क्वचितच आढळणारा हा घाट समजण्यासाठी मला सहज जाणवले ते काही मासले वानगीदाखल बघावेत. एक लुसलुशीत कोवळ्या पांढ-या फेक गाजरांची शेंग वयात आली की आमच्या स्वप्नाची राणी तीच. २. धरणी कूस बदलून निवांत झालेली असते. . गुरांच्या पाया - नाव वाटा फुटतात. ३. सांजेला रानातली पाखरं " आंबेदाखल " होतात ४. नांगराच्या तासातून देवाश्रेष्ठाचा शोष मातीतून " वेटोळ्त " वर येतो. ५. कासवांची पिलं " कुलपत कुलपत " चालतात. आणि ६. नागसापाची पिलं " निळनिळत " सळसळतात. इ."[१५] "चंद्रबना" बद्दलचा हा अभिप्राय निश्चितच अत्यंत बोलका आहे. " चंद्रबना" तील लालित्यमय भाषेबद्दल प्रा. साहेब खंदारे यांचे म्हणणे असे " या लेखांतील प्रतिकात्मक आणि प्रतिमात्मक आणि प्रतिभात्मक भाषेमुळं लालित्यमयता वाढलेली दिसून येते. सहजसुंदर व औचित्य साधणारी भाषा आणि त्यातून अर्थप्रवाहीतता साधण्यासाठी आलेली प्रतिमासृष्टी यामुळं या लेखनाची भाषिक श्रीमंती वाढलेली आहे. उदा - १. ढगांच्या पुंजक्यातून कुणी गंधर्व उतरावेत तसे पांढरे शुभ्र बगळे झुंडीने उतरतात.

२. दु:ख सांगण्यात सांज परतून जायची.

३. पाण्याची द-यात विरत जाणारी धून, तळ्याच्या काळजाचं पाणी करते.

SHIVAJI UNIVERSITY LIBRARY KOLHAPUR

४. मामाच्या अंगातलं वादळ पंड्यारोग झाल्यासारखं विझत चाललं ".[१६]

नलगे यांचा खास नजराणा म्हणून " चंद्रबनातील काही शब्दांचा निर्देश करावा लागेल. उदा - बत्तरबाळ्या ( चिरफळया ), भुकेचा आळका ( भुकेला हलका), अगराळी ( उंचावर ), झोंडाळ ( झोंबी घेणारी ), कोटींबर ( गर्दी ), उमत ( उमेद ), अलाळलेली ( पिकून लिबलिब लेली ), गळको आंबा ( टेच पिकलेला आंबा ), अच्यात ( अलगद ), आठू येणं. ( आठवण येणे ) इ.हे शब्द अर्थपूर्ण व लयदार आहेत. कांही नवे जोड-शब्द इथे पहायला मिळतात.उदा - झोटिंग वारा,गवती रान, पितळी देव, तांबडी तालीम, अक्षराचं बेट, शापित स्वप्न, लाजरी पाणंद आणि रेशमी कापूस इ.इ.

## समारोप

तात्पर्य; अनुभव, त्याचे भाषिक संघटन, निसर्गस्पंदने, कलात्मक व्यक्तिचित्रे, लेखनाला काळ आणि स्थितीचे भान, ग्रामसंस्कृतीचा जागता पट, उत्कटता, काव्यात्मता, पूर्वस्मृतींची ओढ, चिंतनशीलता आणि ग्रामीण शब्दांचा खास नजराणा घेऊननलगे यांच्या " चंद्रबनातल्या सावल्या" मनाला भुरळ घालतात यांत संशय नाही.

# संदर्भटीपा

१. नलगे, चंद्रकुमार
" चंद्रबनातल्या सावल्या "
आ.प. पृ. ५०-५१

२. तत्रैव
पृ. ५२-५३

३. तत्रैव
पृ. ६५

४. तत्रैव
पृ. ७३

५. तत्रैव
पृष्ठ १००

६. तत्रैव
पृष्ठ १३६

७. तत्रैव
पृष्ठ १४९

८. ढेकणे, अर्चना
दक्षिण महाराष्ट्र साहित्य पत्रिका, कोल्हापूर
जुलै ऑगस्ट सप्टेंबर १९९३
पृष्ठ ३५

९. नलगे, चंद्रकुमार
उनि
पृष्ठ १

BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY KOLHAPUR

१०. तत्रैव
पृ. १५०-१५१

११. तत्रैव
पृष्ठ १६०

१२. सावंत, शिवाजी
महाराष्ट्र साहित्य पत्रिका पुणे
फेब्रुवारी १९९०
पृ. ६८

१३. नलगे, चंद्रकुमार
उनि
पृष्ठ १०२, १०३

१४. खंदारे, साहेब
दक्षिण महाराष्ट्र साहित्य पत्रिका, कोल्हापूर
एमेजु १९९३
पृ - ३८

१५. सावंत, शिवाजी
उनि
पृ.६९

१६. खंदारे, साहेब
उनि
पृ. ३९